# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. २१-२२** **दिनांक २५/०१/२०२२**

## फसवणुकीच्या गुन्हयांतील आरोपी अटक करुन मुद्देमाल हस्तगत- नवघर पोलीसांची कामगीरी

तक्रारदार श्री. बाबुसिंग चेनसिंग राठोड, वय ३३ वर्षे, यांची चामुण्डा स्टिल नावाची कंपनी असुन त्यांना दि. १८.०१.२०२२ रोजी एका अनोळखी नंबरवरुन रमेश नावाचे इसमाने फोन करुन त्यांना विश्वासात घेवुन ०२,०८,०००/- रु. किंमतीचे १३६९ किलोग्रॅम वजनाचे स्टिल तारेचे १५ बंडलची ऑर्डर दिली होती. तक्रारदार यांनी रमेश नावाचे इसमाने दिलेल्या ऑर्डरप्रमाणे दिनांक १९.०१.२०२२ रोजी मालाची डिलेव्हरी केली होती. सदर दिवशी अनोळखी इसमाने तक्रारदार यांना ५८,०००/- रु. देऊन उर्वरीत रक्कम १६.०० वा. चे पर्यंत आणुन देतो असे सांगितले होते. त्यानंतर अनोळखी रमेश नावाचे इसमाने सदरचा मोबाईल नंबर बंद करुन तक्रारदार यांचेकडुन घेतलेला मालाचे पैस न देता फसवणुक करुन मालाचा अपहार केलेबाबत नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४२०,४०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन वरिष्ठांनी गुन्हयाची लवकरात लवकर उकल करण्याचे आदेश दिले होते.त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटी करण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक बांबींचे आधारे तसेच तक्रारदार यांनी मालाची डिलेव्हरी केलेले धानुबाग, नालासोपारा पुर्व या ठिकाणचे व आजुबाजुचे सी.सी.टिव्ही फुटेजची पडताळणी केली. गुन्हयातील फसवणुक व अपहार केलेला माल ज्या वाहनाने विल्हेवाट लावलेली आहे त्यांच्याकडे तपास करुन सदरचा गुन्हयात सहभागी असलेला आरोपी नरपतसिंग बेहरसिंग राजपुत, वय २७ वर्षे, यास ताब्यात घेवुन अटक केली. अटक आरोपीताकडे कसुन व कौशल्यपुर्ण तपास करुन गुन्हयातील फसवणुक व अपहार केलेली वरील प्रमाणे संपुर्ण मालमत्ता १०० टक्के हस्तगत करुन गुन्हयाची उकल करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे,पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/भुषण पाटील, पोशि/गणेश जावळे, पोशि/संदिप जाधव, पोशि/सुरज घुनावत, पोशि/विनोद जाधव यांनी केलेली आहे.